ग्राहक संरक्षण कायदा, १९८६
राज्य आयोग, राज्य आयोगाचे नागपूर व औरंगाबाद परिक्रमा खंडपीठ आणि जिल्हा मंच कार्यालयासाठी निर्माण करण्यात आलेल्या ४९७ अस्थायी पदांना दि.०१.०३.२०१६ ते दि.३०.०९.२०१६ या कालावधीकरीता मुदतवाढ देण्याबाबत.....

# महाराष्ट्र शासन

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,

शासन निर्णय क्रमांक : ग्रासंक-२०१६/२१/प्र. क्र.१०/ ग्रा.सं.-४
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दि. २४ फेब्रुवारी २०१६.

वाचा : -

१) शा.नि.अ.ना.पु.व ग्रा.सं.वि.संकीर्ण-२००३/प्र.क्र.४८३/नापु.१४, दि.२६/०६/२००३.
२) शा.नि.वित्त विभाग. क्र.असंक १००१/प्र.क्र.१२ (भाग-२)/२००४/वि.सु.-१, दि.०४/१०/२००४.
३) शा.नि.अ.ना.पु.व ग्रा.सं.वि.क्र. ग्रासंक-१००२/३०८०/प्र.क्र.२६१३/ग्रासं-३, दि.२९/१०/२००४
४) शा.नि.अ.ना.पु.व ग्रा.सं.वि.क्र. ग्रासंक-१००२/२१५३/प्र.क्र.२८१८/ग्रासं-३, दि.२९/१०/२००४
५) शा.नि.अ.ना.पु.व ग्रा.सं.वि.क्र. ग्रासंक-१५०५/८१३/प्र.क्र.३०८९/ग्रासं-३, दि.११/१०/२००४
६) शा.नि.अ.ना.पु.व ग्रा.सं.वि.क्र. ग्रासंक-१२०७/प्र.क्र.३७०२/ग्रासं-३, दि.०७/०६/२००८
७) शा.नि.अ.ना.पु.व ग्रा.सं.वि.क्र. ग्रासंक-१२०८/७४४/प्र.क्र.३९९७/ग्रासं-३, दि.०९/०४/२००९
८) शा.नि.अ.ना.पु.व ग्रा.सं.वि.क्र. ग्रासंक-२०१५/१४७/प्र.क्र.४०/ग्रासं-४, दि.२७/०३/२०१५
९) शा. नि. वि.वि.क्र.पदनि.२०१६/प्र.क्र.८/१६/विसु-१, दि.११ फेब्रुवारी २०१६.

शासन निर्णय :-

ग्राहक संरक्षण कायदा, १९८६ मधील तरतुदींनुसार राज्यात, राज्य स्तरावर राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग आणि जिल्हा स्तरावर, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचांची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच केंद्र शासनाने सन २००२ मध्ये ग्राहक संरक्षण अधिनियमात केलेल्या

सुधारणांच्या परिणामी राज्य आयोगाचे अनुक्रमे नागपूर व औरंगाबाद येथे परिक्रमा खंडपीठ (सर्कीट बेंच) स्थापन करण्यात आले आहेत. राज्य आयोग, जिल्हा मंचाच्या कामकाजात वाढ झाल्याने राज्य आयोग व राज्य आयोगाच्या नागपूर व औरंगाबाद परिक्रमा खंडपीठासाठी वेळोवेळी आवश्यकतेनुसार अधिकारी/ कर्मचारी वृंदांची एकूण ४९७ पदे निर्माण करण्यात आली आहेत.

सदर यंत्रणेतील एकूण ४९७ अस्थायी पदांना अनुक्रमांक ८ येथील दि. २७.०३.२०१५ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ०१.०३.२०१५ ते दिनांक २९.०२.२०१६ या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात आली आहे.

ग्राहक संरक्षण यंत्रणेच्या आस्थापनेवरील या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविलेल्या एकूण ४९७ अस्थायी पदांना दि. ०१.०३.२०१६ ते दि. ३०.०९.२०१६ या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यास खालील नमूद अटींच्या अधीन राहून शासन मंजूरी देण्यात येत आहे.

१) प्रस्तावित ४९७ पदांपैकी कोणतेही पद सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी रिक्त नसावे.
२) सदर पदांवरील वेतनाचा खर्च वित्तीय वर्ष २०१६-१७ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.
३) प्रस्तावित पदे ही सुधारित आकृतीबंधातील असून त्यामुळे सुधारित आकृतीबंधात बदल होणार नाही अथवा संवर्गातही बदल होणार नाही.
४) वित्त विभागाच्या दि.११/०२/२०१६ च्या शासननिर्णयान्वये दिलेल्या निर्देशानुसार राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, आयोगाची परिक्रमा खंडपीठे व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच यासाठी मंजूर करण्यात आलेल्या पदांचा आढावा घेऊन सुधारित आकृतीबंधास मान्यता घेण्याकरिता प्रस्ताव तात्काळ सादर करावा.

२. या विभागाच्या अखत्यारीतील विविध विभाग प्रमुखांच्या आस्थापनेवरील पदांच्या आढाव्याला उच्चस्तर समितीने अंतिमत: मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सुधारीत आकृतीबंध घोषित करण्याबाबत अनुक्रमांक २ येथील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यामध्ये राज्य आयोग व जिल्हा मंचाच्या आस्थापनेवरील एकूण २८३ मंजूर पदांचा समावेश आहे.

३. यासाठी होणारा खर्च "मागणी क्रमांक एम २- २४०८ अन्न साठवण व वखार साठवण (०४) ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ अन्वये राज्य परिषद, राज्य आयोग आणि जिल्हा मंच स्थापना करणे (०४) (०१/०२) मुंबई शहर/मुफसल (२४०८०२५१/२४०८०२६२)०१ वेतन" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१६-१७ या वित्तीय वर्षासाठी मंजूर केलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/विसु-१,दिनांक ११ फेब्रुवारी, २०१६ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

( उ.बा.पाटकर )
कक्ष अधिकारी

प्रतिः-

१) महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
२) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर.
३) अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई.
४) निवासी लेखा परिक्षा अधिकारी,मुंबई.
५) वित्त विभाग, व्यय-४/अर्थसं-१६/वित्तिय सुधारणा.
६) वित्तीय सल्लागार, व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.
७) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
८) प्रबंधक (प्रशासन), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई. ( २ प्रती )
९) प्रबंधक (विधि), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,परिक्रमा खंडपीठ, नागपूर/ औरंगाबाद.
१०) प्रबंधक, सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच.
११) कक्ष अधिकारी ( नापु १२), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग. ( सदर शासन निर्णयाच्या परिच्छेद-१ मधील क्र.-४ च्या अनुषंगाने पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित )
१२) निवडनस्ती ग्रा.सं-४

परिशिष्ट-अ

शासन निर्णय क्र.ग्रासंक-२०१६/२१/प्र.क्र.१०/ग्रासं-४, दि.२४ फेब्रुवारी, २०१६ अन्वये दि.१.३.२०१६ ते.दि.३०.९.२०१६ पर्यत पुढे चालू ठेवण्यात आलेली अस्थायी पदे.

| अ) राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई | | |
|---|---|---|
| अ.क्र. | पदांचे नाव | पदसंख्या |
| १ | प्रबंधक (विधी) | १ |
| २ | प्रबंधक | १ |
| ३ | लेखाधिकारी | १ |
| ४ | लघुलेखक (उच्च श्रेणी) | ३ |
| ५ | लघुलेखक (निम्न श्रेणी) | २ |
| ६ | अधिक्षक | २ |
| ७ | जनसंपर्क अधिकारी | १ |
| ८ | शिरस्तेदार | ३ |
| ९ | सहायक अधिक्षक | २ |
| १० | वरिष्ठ लिपिक | २ |
| ११ | वरिष्ठ अभिलेखापाल | १ |
| १२ | लिपिक टंकलेखक | ६ |
| १३ | बेलिफ | १ |
| १४ | वाहन चालक | १ |
| १५ | पोलिस शिपाई | १ |
| १६ | शिपाई | ७ |
| १७ | रखवालदार | १ |
| १८ | सफाई कामगार | १ |
| | **एकूण** | **३७** |

| ब) जिल्हा मंच | | |
|---|---|---|
| अ.क्र. | पदांचे नाव | पदसंख्या |
| १ | प्रबंधक | ४० |
| २ | लघुलेखक (उच्च श्रेणी) | ३६ |
| ३ | लघुलेखक (निम्न श्रेणी) | ४० |
| ४ | सहायक लेखाधिकारी | ४० |
| ५ | शिरस्तेदार | ४० |
| ६ | सहायक अधिक्षक | ४० |
| ७ | अभिलेखापाल | ४० |
| ८ | लिपिक टंकलेखक | ७६ |
| ९ | शिपाई | ८० |
| | **एकूण** | **४३२** |

| क) राज्य आयोगाचे नागपूर परिक्रमा खंडपीठ | | |
|---|---|---|
| अ.क्र. | पदांचे नाव | पदसंख्या |
| १ | प्रबंधक (विधी) | १ |
| २ | लेखाधिकारी | १ |
| ३ | लघुलेखक (उच्च श्रेणी) | २ |
| ४ | शिरस्तेदार | २ |
| ५ | अधिक्षक | १ |
| ६ | लिपिक टंकलेखक | ३ |
| ७ | शिपाई | १ |
| ८ | रखवालदार | १ |
| | **एकूण** | **१४** |

| क) राज्य आयोगाचे औरंगाबाद परिक्रमा खंडपीठ | | |
|---|---|---|
| अ.क्र. | पदांचे नाव | पदसंख्या |
| १ | प्रबंधक (विधी) | १ |
| २ | लेखाधिकारी | १ |
| ३ | लघुलेखक (उच्च श्रेणी) | २ |
| ४ | शिरस्तेदार | २ |
| ५ | अधिक्षक | १ |
| ६ | लिपिक टंकलेखक | ३ |
| ७ | शिपाई | १ |
| ८ | रखवालदार | १ |
| | **एकूण** | **१४** |
| | **एकूण अ+ब+क+ड** | **४९७** |